नि.फौ.ख.क्र. ५६/२०१८
(नि. ६१)

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – श्रीरंग नागनाथ टाकेकर

वय – ५३ वर्षे, व्यवसाय – नोकरी

नेमणूक – सावंतवाडी पोलीस स्टेशन, ता.सावंतवाडी. जि.सिंधुदुर्ग.

हुद्दा– पोलीस हवालदार ब.क्र.८६

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

सन २०१७ साली माझी नेमणूक वेंगुर्ला पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून होती. मी कर्तव्यावर हजर असताना पोलीस ठाणे अंमलदार यांनी मला दि. १५/११/२०१७ रोजी सांगितले की मौजे देवसू वजराठ येथील महिला ही जखमी असल्याने जिल्हा रुग्णालय ओरोस येथे उपचारासाठी दाखल आहे. मी जिल्हा रुग्णालय ओरोस येथे जावून त्या महिलेची खात्री केली. त्या महिलेचे नाव गितांजली पांडुरंग सावंत–मांजरेकर असे होते. तिच्याकडे चौकशी केली असता तिने तिला मारहाण, शिवीगाळ व गैरप्रकार झाल्याबाबतची तक्रार माझ्याकडे केली. त्याप्रमाणे मी त्या महिलेचा सविस्तर लेखी जबाब लिहून घेतला. तो जबाब मी त्या महिलेला तिचा मुलगा सचिन पांडुरंग सावंत–मांजरेकर यांच्यासमक्ष वाचून दाखविला. त्या जबाबावर त्या महिलेचा अंगठा घेतला व माझी समक्ष म्हणून त्यावर सही केली. जिल्हा रुग्णालय ओरोस येथील वैद्यकीय अधिकारी यांच्यासमक्ष त्या महिलेचा जबाब लिहून घेतला. त्या जबाबावर वैद्यकीय अधिकारी यांची सही व शिक्का होता. (साक्षीदाराला फिर्यादीचा जबाब दाखविण्यात आला.) हा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर त्या महिलेचा अंगठा असून माझी समक्ष म्हणून त्यावर सही आहे. महिलेच्या अंगठ्याखाली तिचे नाव लिहिलेले आहे. तसेच, जबाबावर जिल्हा रुग्णालय ओरोस येथील वैद्यकीय अधिकारी यांची सही व त्यांचा शिक्का दिसून येतो. **(सदर जबाबास निशाणी–पी–२/पीडब्ल्यू२ देण्यात येते.)** सदरचा जबाब मी ठाणे अंमलदार यांच्याकडे त्याच दिवशी आणून दिला. त्यानंतर पोलीस ठाणे अंमलदार यांनी गु.नों.क्र.१७३/२०१७ अन्वये भा.दं.वि.कलम ३५४ब, १४३, १४८, ४५२, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांचेतर्फे सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की गितांजली पांडुरंग सावंत मांजरेकर यांच्याशी माझी त्यांचा जबाब लिहून घेण्यापुर्वी व्यक्तीशः ओळख नव्हती. हे म्हणणे खरे नाही की जिल्हा रुग्णालय ओरोस येथे जी महिला जखमी होती तिचे ओळखपत्र पाहून मी तिच्या नावाची खात्री केली नव्हती. हे

म्हणणे खरे नाही की जिल्हा रुग्णालय ओरोस येथे जी महिला जखमी होती तिचेसोबत तिचा मुलगा सचिन पांडुरंग सावंत मांजरेकर यांचे ओळखपत्र पाहून मी त्यांच्या नावाची खात्री केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की मी जखमी महिला व तिचा मुलगा यांच्या ओळखपत्रांच्या प्रती त्यांच्याकडून घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की जखमी महिलेचा जबाब लिहून घेण्यापुर्वी ती महिला शारिरीक व मानसिकदृष्ट्या जबाब देण्यास सक्षम आहे याबाबतचे प्रमाणपत्र मी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून घेतले नाही. (साक्षीदाराला  निशाणी पी–२/पीडब्ल्यू२ येथील जबाब दाखविण्यात आला.)  हे म्हणणे खरे आहे की सदर जबाबावर वैद्यकीय अधिकारी यांचा माझ्यासमक्ष जखमी महिलेने जबाब दिला असून ती मानसिक व शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचा शेरा दिसून येत नाही.  (साक्षीदाराला  निशाणी पी–२/पीडब्ल्यू२ येथील जबाब पुन्हा दाखविण्यात आला.)  हे म्हणणे खरे आहे की सदर जबाबावर जखमी महिलेचा जो अंगठा आहे त्याच्या खाली तो अंगठा ओळखला म्हणून दस्तुर यांची सही दिसून येत नाही.   हे म्हणणे खरे नाही की जखमी महिला ही खरे सांगत होती की खोटे सांगत होती, तसेच ती शारिरीक व मानसिकदृष्ट्या सक्षम होती किंवा कसे हे मला नक्की सांगता येणार नाही.   हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/–

दिनांक– १३/०३/२०२४

(के.के.पाटील)

न्यायदंडाधिकारी  वर्ग १, वेंगुर्ला.